**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा उलटतपास.**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -राजेश गोपिचंद सोमकुंवर

**उलटतपास शपथेवर वादी तर्फे ॲड.श्री एल.आर.मांडवकर यांच्या मार्फत सुरू.**

२०. गट न.१८ हा माझ्या वडीलांनी सन १९६५ ते १९६७ या कालावधीमध्ये विकत घेतला होता. त्यावेळी माझा जन्म झालेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत मी अभिलेखावर सादर केलेले नाही. माझ्या वडीलांनी सदर शेती ही पटवर्धन नावाच्या इसमाकडुन खरेदी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी पटवर्धन यांच्या नावाचा ७/१२ दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पटपर्धन यांनी माझ्या वडीलांच्या नावाने शेत विकल्यानंतर जो फेरफार करून दिला होता तो फेरफार मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी पटवर्धन यांच्याकडून शेती विकत घेतली होती हे मी खोटे सांगत आहे.

२१. माझ्या वडीलांना तिन भाऊ होते त्यांची नावे राजहंस सोमकुंवर, प्रभाकर सोमकुंवर व माझे वडील नामे गोपीचंद वारलु सोमकुंवर अशी आहे. माझ्या वडीलांचे वडील वारलु यांना किती भाऊ होते हे मला माहीती नाही. किसन आणि अभिमान हे कोण होते हे मला माहित नाही. आता मला नि.क्र.४९ अधिकारअभिलेख पंजी दाखविण्यात आली त्यात माझ्या वडीलांनी पटवर्धन यांच्याकडुन सदर वादमिळकत शेती रूपये ४,०००/– मध्ये खरेदी केली असे नमुद आहे. सदर शेती ही तिघा जणांनी खरेदी केली होती त्यांची नावे मला सांगता येतात. सदर तिघांची नावे ही (१)अभिमान तुरूपकर, (२)किसन सोनटक्के व (३)गोपिचंद सोमकुंवर असे होते. सदर तिघा जणांनी अंदाजे प्रत्येकी सात–सात एकर जमिन खरेदी केली होती. त्यापैकी अभिमान यांची जमिन जास्त होती. अभिमान तुरूपकर हा आजरोजी जिवंत नाही. अभिमान तुरूपकर यांनी त्यांची जमिन दौलत सोनवाने यांना विकली होती. त्यानंतर दौलत सोनवाने यांनी सदर जमिन प्रकाश निमुळकर यांना विकलेली आहे.

२२. किसन सोनटक्के यांनी त्यांची शेती विकलेली आहे. सदरची शेती ही किसन

सोनटक्के यांनी ठाकरे यांना विकलेली आहे. मला असे म्हणायचे आहे की, किसन सोनटक्के, अभिमान तुरूपकर व माझे वडील गोपीचंद सोमकुंवर यांनी संयुक्तपणे शेती विकत घेतली होती. सदर शेतीमध्ये माझे वडील व इतरांमध्ये केव्हा पार्टीशन झाले होते हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत मी रेकॉर्ड अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२७ मध्ये माझ्या वडीलांच्या नावाने ०.३८ व ७.०० एकर जागा दाखविलेली आहे. **सदर प्रश्नावर प्रतिवादीचे वकील श्री गलांडे यांनी हरकत घेउन सांगितले की, सदर जमिन ही तिघांनी संयुक्तरित्या विकत घेतली होती व त्याबाबत नि.क्र.४९ वर तिघांची नावे नमुद आहे. सदरच्या हरकतीवर वादीच्या वकीलांनी युक्तीवाद करून सांगितले की, सदर जमिन ही फक्त गोपीचंद सोमकुंवर यांच्याच मालकीची आहे. सदर हरकत व त्यावरील युक्तीवाद दस्तऐवजाच्या अनुषंगाने अंतिम युक्तीवादाच्या वेळी युक्तीवादासाठी खुला ठेवण्यात येत आहे.**

**२३.** गट नंबर २० हा माझे वडील गोपिचंद यांच्या नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२० मधील शेती ही माझ्या वडीलांना त्यांच्या वडीलांकडुन मिळाली होती. माझे आजोबा वारलु सोमकुंवर हे केव्हा मयत झाले हे मला माहित नाही.

**प्रश्न**–तुमचे वडील गट न.२० मधील शेतीवर मशागत करून उदर्निवाह करित होते काय?

**उत्तर**–मशागत करून रोजमजुरी करित होते.

हे म्हणणे खरे आहे की, सदर शेतीवर माझी आई राबत होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेतीवर माझे भाऊ–बहीण राबत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना गट न.२० मधील शेतीतुन भरमसाठ उत्पन्न होत होते. हे म्हणणे खरे नाही की, गट न.२० मधील शेतीतील उत्पन्नातुन व संयुक्त उत्पन्नातुन गट न.१८ मधील शेती माझ्या वडीलांनी खरेदी केली होती.

**प्रश्न**–गट न.१८ मधील शेती विकत घेण्यापुर्वी गट न.२० च्या व्यतिरिक्त इतर कोणते उत्पन्नाचे साधन तुमच्या वडीलांकडे होते याबाबत तुम्ही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला आहे काय?

**उत्तर**–दाखल केलेला नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, त्यावेळी माझा जन्मच व्हायचा होता.

**प्रश्न**–तुम्ही तुमचे लेखी बयाण व शपथपत्र यामध्ये गट न.१८ मधील शेती खरेदी करण्यासाठी स्वतंत्र उत्पन्न होते असे नमुद केले आहे काय?

**उत्तर–**नाही.

**२४.** माझ्या वडीलांना दोन भाऊ व एक बहीण होती. माझा एक काका प्रभाकर हा जिवंत आहे. माझे वडील व त्यांच्या भावांमध्ये वडीलोपार्जित मिळकतीचे कधी पार्टीशन झाले याबाबत मला माहिती नाही. सदर पार्टीशन झाल्याबाबत महसूल रेकॉर्ड मिळालेला नाही. हे मला माहित नाही की, गट न.१८ मधील शेती खरेदी करतेवेळी माझ्या वडीलांच्या भावांमध्ये पार्टीशन झाले होते किंवा कसे.

**२५.** मी गट न.२० चे खरेदीखत अभिलेखावर दाखल केलेले नाही. विनोद याने गट न.२० हा कधी, केव्हा व कुणाला विकला याबाबत माझे लेखी बयाण व शपथपत्रामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर विनोद याने गट न.२० कधी, केव्हा व कुणाला विकला याबाबत दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**२६.** गट न.१८ संबंधिचे मृत्यूपत्र हे सन २०२१–२२ मध्ये करून दिलेले असावे. मृत्यूपत्र हे उमरेड तहसिलमध्ये झाले होते. सदर मृत्यूपत्र करण्यासाठी माझे वडील आले होते. सदर मृत्यूपत्र करतेवेळी मी, माझी मुले इ. कुणीही आले नव्हते. सदर मृत्यूपत्र लिहीतेवेळेस माझ्या वडीलांसोबत कोण–कोण आले होते याबाबत मला काहीही माहिती नाही. सदर मृत्यूपत्र करतेवेळी माझ्या वडीलांची शारिरिक व मानसिक परिस्थिती कशी होती याबाबत मला माहित आहे. त्यावेळी माझ्या वडीलांची शारिरिक व मानसिक परिस्थिती चांगली होती. त्यावेळी माझा भाऊ नामे विनोद हा पुर्वीच मयत झालेला होता.

**प्रश्न–**विनोद मयत झाल्यानंतर वादी राणी ही तुमच्याच कुटूंबामध्ये तुमच्यासोबत राहत होती काय?

**उत्तर–**राहत होती, परंतु तिचे माहेर जवळच असल्यामुळे अधुन मधुन माहेरात जात होती.

**प्रश्न–**विनोद मयत झाल्यानंतर वादी राणी ही किती दिवसानंतर तिच्या माहेरी राहायला गेली?

**उत्तर–**विनोद याचा तिसरा दिवस झाल्यानंतर वादी राणी ही तिच्या माहेरी राहायला गेली.

हे म्हणणे खरे नाही की, विनोद मयत झाल्यानंतर वादी राणी व तिच्या मुलाबाळांचा आम्ही छळ केला होता व तिला घरातुन हाकलले त्यामुळे तिला नाईलाजाने माहेरी जाणे भाग पडले होते?

**२७.** प्रतिवादी क्र.४ वर्षा व प्रतिवादी क्र.५ संध्या ह्या माझ्या बहीणी आहेत. मला

संगिता नावाची बहीण होती, ती मयत झालेली आहे व तिला अभिजित आणि प्रनव अशी दोन मुले आहेत. माझा भाऊ विनोद मयत झाल्यानंतर माझे वडील अंदाजे दहा वर्षे जगले.

**प्रश्न–**विनोदची पत्नी राणी व तिची मुलगी हिच्यासोबत तुमच्या वडीलांचे संबंध कसे होते?

**उत्तर–**चांगले होते.

**प्रश्न–**तुमची बहीण वर्षा, संध्या तसेच मयत संगिता व तिची मुले यांच्यासोबत तुमच्या वडीलांचे संबंध कसे होते?

**उत्तर–**चांगले होते.

**प्रश्न–**तुमच्या वडीलांनी केलेल्या मृत्यूपत्रामध्ये तुमची बहीण वर्षा, संध्या तसेच मयत संगिता व तिची मुले व तसेच वादी व तिची मुले यांच्याबाबत काही तरतुद केलेली आहे काय?

**उत्तर–**नाही.

हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर १८ मधील शेती ही गट न.२० मधील शेतीच्या उत्पन्नातुन खरेदी केलेली असल्यामुळे माझ्या वडीलांना गट न.१८ या शेतीबाबत मृत्यूपत्र करून देण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, गोपीचंद यांची तब्येत चांगली राहत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ चे पति विनोद यांचा मृत्यू अपघाताने झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, विनोद याचा मृत्यू अपघाताने झाल्यामुळे गोपिचंद यांना मानसिक धक्का बसला होता व ते मानसिकदृष्ट्या खचून गेले होते व त्यामुळे त्यांना स्मृतिभ्रंश हा आजार होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांच्या तब्येतीचा गैरफायदा घेउन खोटे मृत्यूपत्र तयार केले.

**२८.** हे म्हणणे खरे आहे की, गट न.२० गोपिचंद यांच्या नावाने आहे व त्यामध्ये गोपिचंद यांच्या सर्व वारसांचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत घरांमध्ये वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा आहे.

**प्रश्न–**हळदगांव येथील घर व परसोडी येथील प्लॉट यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे हिस्से आहेत काय?

**उत्तर–**होय.

हे म्हणणे खरे नाही की, गट न.१८ मधील शेतीचे खोटे मृत्यूपत्र केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२० च्या वडीलोपार्जित उत्पन्नाबाबत मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे

शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरेड
दि ०६.०१.२०२६

(आर.एस.मानकर)
२रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरेड
उमरेड